# ”यावल महाविद्यालयात ध्वजारोहण”

यावल (वार्ताहर) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी विज्ञान शाखेतील सीमा पाडवी हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे स्थानिक समितीचे संचालक मा. सुनील भोईटे उपस्थित होते. कार्यक्रमास प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, प्रा. खैरनार, प्रा. संजय पाटील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

